जनसंपर्क अधिकारी
पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २१५** **दिनांक :- १३/०८/२०२१**

## शासनाचे आदेशास अनुसरुन मिरा-भाईंदरमध्ये आस्थापना चालू ठेवण्याबाबत दिनांक १५/८/२०२१ पासून शिथिलता.

महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणु संसर्गाचा प्रादुर्भाव लक्षात घेता राज्यात यापुर्वी वेळोवेळी आदेश अधिक्रमित करुन संपुर्ण राज्यासाठी नव्याने निर्देश पारित करुन मनाई आदेशांतील निबंर्धांमध्ये शिथिलता दिलेली आहे. महाराष्ट्र शासनाने दिनांक ११/०८/२०२१ रोजी कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५ चे अन्वये आदेश पारित करुन आस्थापना चालू ठेवण्यासंदर्भात मार्गदर्शक सुचना लागू केलेल्या आहेत. त्याअनुसार श्री. विजयकांत सागर, पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय यांनी **मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्राकरिता** फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील कोविड संसर्गास तात्काळ प्रतिबंधक उपाय योजना म्हणुन जनतेस, आस्थापना यांना उद्देशुन आदेश काढलेले आहेत.

त्याचप्रमाणे **मिरा-भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रा करिता** दिनांक ०६/०६/२०२१ रोजी निर्गमित करण्यात आलेल्या मनाई आदेशामध्ये यासोबत जोडलेल्या आदेशांमध्ये नमुद अतिरीक्त शिथीलता नियमांचा समावेश करण्यात आला असुन सदरचा मनाई आदेश दिनांक १५/०८/२०२१ रोजी पासुन पुढील आदेश होईपर्यंत लागू राहतील. तसेच यापुर्वी पोलीस उपआयुक्त (मुख्यालय), कार्यालयाकडील दि.०३/०८/२०२१ रोजीचे आदेश दि. १४/०८/२०२१ रोजीचे रात्री १२.०० वाजता संपुष्टात येतील.

सोबत:- कोरोना-२०२१/प्र.क्र.३६६/आ-५ दिनांक ११/०८/२०२१ रोजीचा महाराष्ट्र शासनाचा आदेशाची प्रत.

----ooo----